# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अन्वये शहरातील प्रत्येक
**{मालमत्ता कर विभाग}** जमिनी व इमारतीवर कर योग्य मूल्य आधारित पध्दतीने मालमत्ता कर आकारण्याचे काम निरंतर चालू असते. आर्थिक वर्ष 2023-2024 मध्ये एकूण 705000 मालमत्तांचा सर्वे करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमची अनुसूची "ध" प्रकरण VIII चे कराधान नियम 39 च्या तरतूदी अन्वये "मालमत्ता कर वसूल करणेसाठी तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल. असे या अधिनियमान्वये किंवा तदनुसार जाहीर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हफ्ता देय होईल तेव्हा, मा. आयुक्ताने फारसा विलंब न लावता, उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तिने देय असलेल्या रक्कमेचे बिल देण्याची व्यवस्था केली पाहीजे."

आर्थिक वर्ष 2024-2025 करीता सामान्य प्रशासन विभाग म.न.पा. चे दर करार क्र. साप्रवि/409/एम दि. 01/10/2021 अन्वये Jobwork करीता 2.25/- प्रति पान दर निश्चित आहे. सदर मंजूर दर प्रमाणे एकूण 1410000 मागणी देयक छपाई करण्याकरीता लागणारा एकूण रु. 3172500/- खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 851/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 10/04/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), मालमत्ता कर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अन्वये शहरातील प्रत्येक जमिनी व इमारतीवर कर योग्य मूल्य आधारित पध्दतीने मालमत्ता कर आकारण्याचे काम निरंतर चालू असते. आर्थिक वर्ष 2023-2024 मध्ये एकूण 705000 मालमत्तांचा सर्वे करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमची अनुसूची "ध" प्रकरण VIII चे कराधान नियम 39 च्या तरतूदी अन्वये "मालमत्ता कर वसूल करणेसाठी तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल. असे या अधिनियमान्वये किंवा तदनुसार जाहीर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हफ्ता देय होईल तेव्हा, मा. आयुक्ताने फारसा विलंब न लावता, उक्त कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, तिने देय असलेल्या रक्कमेचे बिल देण्याची व्यवस्था केली पाहीजे."

आर्थिक वर्ष 2024-2025 करीता सामान्य प्रशासन विभाग म.न.पा. चे दर करार क्र. साप्रवि/409/एम दि. 01/10/2021 अन्वये Jobwork करीता 2.25/- प्रति पान दर निश्चित आहे. सदर मंजूर दर प्रमाणे एकूण 1410000 मागणी देयक छपाई करण्याकरीता लागणारा एकूण रु. 3172500/- खर्चाच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.